# नियमित दिवाणी दावा क्रं.९८/२०२१ मधील अर्ज (नि.४५) वरील आदेश

वादीतर्फे दाखल अर्ज (नि.४५) व प्रतिवादीतर्फे दाखल म्हणणे वाचले. वादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरूध्द मौजे गोखळी ता. फलटण जि. सातारा येथील दावा मिळकत जमीन गट नं. 59 बाबत दाखल केलेला आहे. सदरील मिळकतीचे अनुषंगाने प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मागितलेली आहे. याकामी प्रतिवादी यांचे कैफियतीतील तसेच त्यांनी केलेल्या प्रतिदाव्यातील कथन पाहिले तर दावा जमीन गट नं. 59 ही वादीचे मालकी वहिवाटीची असलेचे प्रतिवादींनी मान्य केलेले आहे. तसेच वादीचे मिळकतीचे लगत पूर्वेस प्रतिवादींची मिळकत गट नं. 58 ही आहे याबाबत देखील प्रतिवादींनी मान्यता दिलेली दिसून येते. दोन्ही मिळकती या एकमेकांस लागून आहेत. तसेच सदर दोन्ही मिळकतींचे संदर्भाने वादी व प्रतिवादी नं. 3 यांचेत दि. 01.03.2019 रोजी नोटरी करारनामा झाला आहे ही बाब देखील उभय पक्षकारांना मान्य व कवूल आहे. सदरचा करारानामा हा मा. नोटरी पब्लीक सो श्री. एस. एस. खलाटे फलटण यांचेसमोर अ. नं. 1060 येथे त्याच दिवशी नोंदलेला आहे. दावा व प्रतिदाव्यातील कथने पाहता सदरचा मुळ नोटरी करारनामा दस्त मे. न्यायालयाचे रेकॉर्डवर येणे गरजेचे झालेले आहे. सदरचा मुळ करारनामा दस्त हा प्रतिवादी नं. 3 चे कब्जात आहे. सदरचे दस्तऐवजाचा तपशील प्रस्तुत अर्जात दिलेला आहे. सदर नमुद करारनामा हा दाव्यातील प्रतिवादी क्रं. ३ मैनाबाई अशोक खटक यांचे ताब्यात आहे. सदर करारनामा प्रस्तुत दाव्याचे कामी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. यामुळे न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे. या करारनाम्याशिवाय दोन्ही पक्षकारांचा पुरावा घेणे शक्य होणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.३ यांना नमुद करारनामा प्रस्तुत दाव्याचे कामी दाखल करणेस आदेशित करणेची व अर्ज मंजुर करणेची विनंती केली.

३. प्रतिवादीतर्फे वकिलांनी योग्य ते न्यायाचे हुकुम होणेची विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

५. वादीचे कथनांनुसार, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. या मिळकतीसंदर्भात वादी व प्रतिवादी क्र.३ यांचेत करारनामा झाला आहे व ही बाब दोन्ही पक्षकारांना मान्य व कबुल आहे व सदरचा दस्त हा प्रतिवादी क्र.३ चे कब्जात आहे. तरी, सदरचा करारनामा केसच्या कामी येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असल्याने, अंतिम न्यायदानास मदतच होणार आहे. प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप घेतलेला दिसून येत नाही. तरी, सदरचा करारनामा न्यायालयात दाखल झाल्यास प्रतिवादी यांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. तरी, प्रतिवादी यांना दाव्याचे कामी आपली बाजु मांडण्याची संधी उपलब्ध आहे. तरी, सदरचा मुळ करारनामा न्यायालयात दाखल होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतो –

## आदेश

१. अर्ज (नि.४५) प्रमाणे नमुद मागणीसाठी मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.३ यांना सदर मुळ करारनामा पुढील नेमले तारखेपर्यंत अगर त्या अगोदर अभिलेखावर दाखल करणेकरीता आदेशित करणेत येते.

३. येणेप्रमाणे नोंद घ्यावी.

Kalyani Rajaram Patil

Digitally signed by Kalyani Rajaram Patil
DN: cn=Kalyani Rajaram Patil, ou=BOMBAY HIGH COURT, o=BOMBAY HIGH COURT, st=MAHARASHTRA, c=IN
Date: 2023.01.03 17:44:34 +0530

फलटण

दिनांक– ०२/०१/२०२३. (श्रीमती के.आर.पाटील.)

६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फलटण.